जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर
इमेल.cp.thane.pro@mahapolice.gov.in
मो.क्र.९८१९२०८२७९

प्रेसनोट **दिनांक २६.०९.२०२५**

मालमत्ता गुन्हे कक्ष, गुन्हे शाखेकडून मोबाईल स्नॅचिंगचे ०७ गुन्हे उघडकीस आणुन ॲपल तसेच वेगवेगळया कंपनीचे ०६ किंमती मोबाईल हस्तगत व ०५ आरोपी जेरबंद

ठाणे शहर पोलीस आयुक्त परिसरात वाढत्या मोबाईल स्नॅचिंग चोरीच्या गुन्हयांना आळा घालण्याकरीता तसेच दाखल असलेले गुन्हे उघडकीस आणण्याकरीता मा. वरिष्ठांकडुन वेळोवेळी मार्गदर्शन व सुचना प्राप्त झाल्या होत्या. त्या अनुषंगाने मालमत्ता गुन्हे कक्ष, गुन्हे शाखा घटकाकडुन मोबाईल स्नॅचिंग चोरीबाबत समांतर तपास चालु होते. पोना/५७९९ सचिन कोळी व पोना/६६२६ तौसिफ सैयद यांना मिळालेल्या गोपनिय बातमी प्रमाणे व तांत्रिक विश्लेषणानंतर भिवंडी परिसरात सापळा रचुन आरोपी नामे **१) मोहंमद यासीन रफीक शेख वय २४ वर्षे,** रा. भिवंडी, **२) माझ मोहंमद अयुब मोमीन वय २१ वर्षे,** रा. चटोर गल्ली, भिवंडी, **३) अल्केश परवेज मोमीन वय २३ वर्षे** रा. भिवंडी, **४) मोहंमद उबेद उर्फ लाला मोहंमद आरीफ शेख वय २१ वर्षे** रा.भिवंडी, **५) सदरुददीन जमालुददीन अन्सारी वय ४७ वर्षे** रा. भिवंडी यांना अटक करून त्यांच्याकडे कौशल्यपुर्ण तपास करून त्यांनी ठाणे पोलीस आयुक्तालय हददीतून चोरी केलेल्या एकुण २,२६,०००/- रू. किंमतीचे ॲपल तसेच वेगवेगळया कंपनीचे ०६ मोबाईल फोन तसेच ५०,०००/-रु. किमतीची सुझूकी बर्गमॅन मोटार सायकल हस्तगत करण्यात आले असुन त्यांच्या कडून नारपोली, श्रीनगर, राबोडी, कळवा, ठाणे रेल्वे पोलीस स्टेशन या पोलीस स्टेशन हद्दीतील एकुण ०७ गुन्हे उघडकीस आणुन मोलाची कामगिरी केली आहे.

सदरची कारवाई ही पोलीस उप आयुक्त श्री.अमरसिंह जाधव, गुन्हे, ठाणे, सहाय्यक पोलीस आयुक्त श्री.विनय घोरपडे, गुन्हे शोध - २, गुन्हे, ठाणे, यांच्या मार्गदर्शनाखाली मालमत्ता गुन्हे कक्षाचे वपोनिरी/गोरखनाथ घार्गे, सपोनिरी/अब्दुल मलीक, पोउनि/संजय भिसे, सपोउनि/शिवाजी गायकवाड, पोहवा/ दिनेश कुंभारे, प्रशांत भुर्के, अनुप कामत, जयकर जाधव, राहुल शिरसाठ, वसंत चौरे, संदीप भांगरे, महेश साबळे, पोना/सचिन कोळी, तौसीफ सैयद, अशोक पाटील, महेश सावंत, चापोअं/सदन मुळे, तसेच मपोहवा/आशा गोळे यांनी केलेली आहे.

(शैलेश साळवी)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर